महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२०/ ४९७ दिनांक : 18 MAR 2020

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानानित पदविका/पदवी/पदयुत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषयः- **YIN Summer Youth Summit-2020 मध्ये सहभागी होणेबाबत. . . .**

संदर्भः- १. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. मंत्री/उ.व.तं.शि./व्ही.आय.पी./२७९/२०२०, दिनांक २८.०२.२०२०

२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०२०/४०७, दिनांक १३ मार्च, २०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे 'सकाळ' मीडीया ग्रुप मार्फत दि. ३० व ३१ मे, २०२० रोजी गणेश कला क्रिडा मंच, पुणे येथे Young Inspirators Network (YIN) Summer Youth Summit-2020 चे आयोजन केलेले आहे. सदर कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ञांची व्याख्याने तसेच व्यक्तिमत्व व कौशल्य विकास, स्पर्धात्मक परीक्षांची तयारी या बाबत मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच भविष्यात येणा-या तंत्रज्ञानाबाबत माहिती व नामांकीत उद्योजकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी लाभणार आहे. या समीट साठी आपल्या महाविद्यालयातील २ विद्यार्थी व २ विद्यार्थीनींना सहभागी होण्यासाठी प्रेरीत करावे. सदर समीट करीता रजिष्ट्रेशन फी रु.१,०००/- इतकी राहील. त्यामध्ये विद्यार्थ्यास एक टी-शर्ट, बॅग, डायरी, आयडी कार्ड, प्रमाणपत्र देण्यांत येईल. तसेच यामध्ये दोन दिवसांकरीता राहण्याचा, भोजनाचा खर्च समाविष्ट आहे. नांव नोंदणी करीता खालील व्यक्तींशी संपर्क साधावा.

| अ.क्र. | संपर्क प्रतिनिधीचे नांव | ईमेल आयडी | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१. | श्री हरिश शर्मा औरंगाबाद | Harishs450@gmail.com | ७३८७३३३८७८ |
| ०२. | श्री आकाश गायकवाड जालना | akashssgaikwad@gmail.com | ९९२२८५००४४ |

सदर समिटमध्ये आपल्या संस्थेतुन सहभागी होणा-या विद्यार्थ्यांची माहिती व अहवाल या कार्यालयास दिनांक १५ मे, २०२० पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३, ४५०
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/ एनजीसी/२०२०/ ४०७ — दिनांक : 13 MAR 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर

विषय : YIN Summer Youth Summit — २०२० मध्ये सहभागी होणेबाबत.....

संदर्भ : मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. मंत्री/उ.व.तं.शि./व्ही.आय.पी./२७९/२०२०, दि. २८.०२.२०२०

मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण यांनी संचालनालयास उद्देशुन लिहिलेल्या संदर्भीय पत्राची सहपत्रासह प्रत सोबत जोडली असून ती पहावी.

"सकाळ" मीडीया ग्रुप मार्फत दि. ३० व ३१ मे, २०२० रोजी गणेश कला क्रिडा मंच, पुणे येथे आयोजित Young Inspirators Network (YIN) Summer Youth Summit — २०२० या उपक्रमात प्रत्येक महाविद्यालय निहाय दोन विद्यार्थी व दोन विद्यार्थीनींना सहभागी होण्यास प्रेरीत करुन उपक्रमात स्टॉल उभारण्यास मा. मंत्रीमहोदयांनी सुचित केले आहे. यास्तव आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थाना संदर्भीय पत्र अग्रेषित करुन त्यानुसार विद्यार्थ्यांना उपक्रमात सहभागी होण्यास प्रेरीत करण्याच्या सुचना आपले स्तरावरुन देण्यात याव्यात. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा कार्यपालन अहवाल या संचालनालयास सादर करावा.

(संदीप कदम)भा.प्र.से.
प्र. संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी

F:\vijay_06022018\Kedare\others\YIN Summer Youth cummit 2020.docx

जा. क्र. मंत्री/उ. व तं. शि./एम.आय.पी. 1208/20.20

मंत्री
उच्च व तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : 28/02/2020

**प्रति,**
**संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**विषय : YIN Summer Youth Summit-२०२० मध्ये सहभागी होणेबाबत.**

**'सकाळ'** मीडीया ग्रुप ने Young Inspirators Network (YIN) Summer Youth Summit-२०२० चे आयोजन दि.३० व ३१ मे २०२० रोजी गणेश कला क्रिडा मंच, पुणे येथे आयोजित केले आहे. युवकांच्या सर्वांगिण विकास व भविष्यातील कौशल्य व इतर संधीचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

या Summer Youth Summit-२०२० मध्ये आपल्या विद्यापीठातून व त्याच्याशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतून प्रत्येकी दोन विद्यार्थी व दोन विद्यार्थीनींना या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरीत करावे तसेच आपल्या विद्यापीठाच्या उपक्रमांची माहिती देणारा स्टॉल सदर समीट मध्ये उभारण्यात यावा. याबाबत सर्व संबंधितांस कळविण्यात यावे.

**(उदय सामंत)**